नवराष्ट्र

# प्राजक्ता कनिष्ठ महाविद्यालयात सायबर सुरक्षा मार्गदर्शन

अकोला, ब्युरो. येथील प्राजक्ता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन शिबिराचे आयोजन झाले.

शिबिरात सायबर क्राईम आणि त्याचे प्रकार, सोशल मीडियाच्या माध्यमातून ऑनलाइन गुन्हे कसे घडतात, इंटरनेट आणि मोबाइलच्या माध्यमातून होणारे फ्रॉ*, तसेच अशी ऑनलाइन फसवणूक होऊ नये, यसाठी कोणती काळजी घ्यावी याविषयी सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. कार्यशाळा शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय अकोला यांच्या सहकार्याने क्विक हिल फाउंडेशन, पुणे आणि महाराष्ट्र सायबर सेल, मुंबई यांच्या सहकार्याने घेण्यात आले.



कार्यक्रम प्राचार्य सागर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केला होता. अध्यक्षस्थानी वनिता सावरकर होत्या. प्रमुख अतिथी म्हणून पडवाल उपस्थित होते. सायबर वॉरियर्स शीतल फंदाट, वैभवी गंगावते यांनी मार्गदर्शन केले. संचालन किरण खैरे यांनी केले. आभार सीमा पवार यांनी मानले. कार्यशाळेला मीनाक्षी देशमुख, स्वप्नगंधा जगताप, शैलजा डाबेराव, पाचवी ते दहावीचे विद्यार्थी उपस्थित होते.